| CNR NO :- MHAM170004672024 | म.सं.कौ.हि. का. अर्ज क्रमांक ११/२०२४ |
|---|---|
| | सौ. पुजा जिवन झाटे<br>–विरुध्द–<br>जिवन झाटे + १ |

**आदेश निशानी क्रमांक ५**

**(पारित दिनांक ०६.०७.२०२६)**

प्रस्तुत अर्ज अर्जदाराने महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासुन संरक्षण अधिनियम, २००५ (यापुढे सोयीसाठी थोडक्यात “अधिनियम” असे संदर्भित) च्या कलम २३ अन्वये अंतरिम पोटगीसाठी दाखल केलेला आहे.

**अर्जदाराच्या अर्जाची थोडक्यात हकीगत खालीलप्रमाणे**:

२) अर्जदार अर्जमध्ये असे कथन करते की, गैरअर्जदार क्रमांक १ हे अर्जदार हीचे पती असुन अर्जदाराचा विवाह दिनांक ०३.०५.२०२० रोजी गैरअर्जदार क्रमांक १ यांच्यासोबत बौध्द रितीरिवाजाप्रमाणे झाला होता. गैरअर्जदार क्रमांक २ हया अर्जदाराच्या नणंद आहेत. विवाहानंतर अर्जदार ही पंरपरेनुसार वैवाहीक जीवन जगण्याकरीता गैरअर्जदार क्रमांक १ यांचे राहते घरी दलपतपुर, ता. आष्टी, जि. वर्धा येथे लग्नामध्ये मिळालेल्या किंमती वस्तूसह त्यांच्यासोबत नांदावयास गेली. विवाह संबंधातून अर्जदारास कोणते अपत्य नाही अथवा अर्जदार सदर विवाह संबंधातून गभेवती देखील नाही.

३) अर्जदार पुढे असे कथन करते की, गैरअर्जदार क्रमांक १ यांचे सोबत अर्जदार लग्नापासुन सहा महिने सोबत आनंदी जीवन जगत असतांना दिनांक ३१ डिसेंबर २०२० रोजी अचानक अर्जदाराची तब्येत खालावली, अर्जदाराचे मोठया प्रमाणात डोके दुखत असल्याने अर्जदार आपल्या माहेरी आल्या आणि तेथुन अमरावती येथे दवाखन्यात जायला निघाल्या असता रस्त्यातच अर्जदार कोमात गेल्या तरी सुध्दा अर्जदारचे आई–वडीलांनी तसेच गैरअर्जदार क्रमांक १ यांनी अर्जदारास अमरावती दवाखन्यात भरती केले. भरती झाल्यानंतर तपासणी अंती अर्जदाराचे डोक्यात गाठ असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. सदरहु गाठीचे ऑपरेशन अमरावती येथे होत नसल्याने अर्जदाराचे आई–वडीलांनी अर्जदारास ऑपरेशन करीता नागपुर येथे नेले असता अर्जदार डोक्याचे दिनांक २४ जानेवारी २०२१ रोजी ऑपरेशन करण्यात आले. ऑपरेशनातून बरे झाल्यानंतर काही दिवस राहिल्यानंतर पुन्हा अर्जदारास डोक्याचा त्रास सुरु झाला. अर्जदाराचे आई–वडीलांनी अर्जदारास पुन्हा दवाखान्यात नागपुर येथे नेले. अर्जदाराच्या तपासण्या अंती डॉक्टरांनी पुन्हा ऑपरेशन करण्याचा सल्ला दिला. त्यामुळे सन २०२२ मध्ये अर्जदाराचे दुसरे ऑपरेशन करण्यात आले.

४) अर्जदार पुढे असे कथन करते की, दुसरे ऑपरेशन झाल्यानंतर अर्जदार आपल्या माहेरी आल्या आणि राहु लागल्या परंतु गैरअर्जदार क्रमांक १ तसेच गैरअर्जदार क्रमांक १ च्या कुटुंबातील इतर सदस्य अर्जदाराचे भेटीस अर्जदाराच्या माहेरी आले नाही.

तसेच अर्जदाराचे ऑपरेशन करीता लागणारा खर्च सुध्दा दिलानाही. अर्जदार बऱ्या झाल्यानंतर अर्जदारानी गैरअर्जदार क्रमांक १ ला फोन करुन घेण्यासाठी बोलविले असता आता मला वेळ नाही, आत तू मला पाहिजे नाही असे म्हणुन अर्जदाराचा आर्थीक, मानसिक व शारिरीक छळ करणे सुरु केले. अर्जदाराची माहेरील परीस्थीती अत्यंत बिकट असून सुध्दा अर्जदाराचे आई–वडील अर्जदाराचे बिमारी करता खर्च करीत आहे. सदरच्या प्रकारामुळे अर्जदाराचा मानसिक व शरिरीक छळ झाला आहे.

५) अशा परिस्थीतीत अर्जदार ही माहेरी रहात असुन, तिच्याकडे उत्पन्नाचे कुठलेही साधन नाही. याउलट गैरअर्जदार क्रमांक १ चे वडील चंद्रपाल झाटे यांचा २५ वर्षापुर्वी मृत्यु झाला असुन गैरअर्जदार क्रमांक १ ची आई गैरअर्जदार क्रमांक १ सोबत न राहत ती तीच्या भावाच्यासोबत तिच्या भावाच्या गावी राहते. गैरअर्जदार क्रमांक २ ही गैरअर्जदार क्रमांक १ ची मोठी बहीन असुन ती शासकीय सेवेत नर्स या पदावर कार्यरत आहे. करीता गैरअर्जदार क्रमांक १ वर अर्जदार व्यतिरीक्त इतर कोणाचीही जबाबदारी नाही. गैरअर्जदार क्रमांक १ चे वडील चंद्रपाल झाटे यांचा मृत्यु झाला असुन त्यांच्या नावे व मालकीची मौजा दलपतपुर, ता. आष्टी, जि. वर्धा येथे शेत सर्वे क्रमांक ३०, १ हे. २१ आर. धारणधिकर –अ हे शेत जमीन आहे. तसेच गैरअर्जदार क्रमांक १ चे आजोबा अवचित झाटे यांचा मृत्यु झाला असुन त्यांच्या नावे व मालकीची मौजा दलपतपुर, ता. आष्टी, जि. वर्धा येथे शेत सर्वे क्रमांक १३१/२, ०.२५ हे.आर धारणधिकर – अ शेत

जमीन ओ. शेत सर्वे क्रमांक १३३, ०.१७ हे.आर. धारणधिकार–अ शेत जमीन आहे, शेत सर्वे क्रमांक १३६, ०.५६ हे.आर. धारणधिकार –अ शेत जमीन आहे.

६) वरील चारही शेत गैरअर्जदार क्रमांक १ हे वाहीफेरी करुन त्या चारही शेता मधून पिक घेऊन वर्षाला रक्कम रुपये ७,००,०००/– उत्पन्न मिळवितात. गैरअर्जदार क्रमांक १ यांचेकडे उत्पन्नाचे भक्कम साधन आहे व त्याचेवर अर्जदार शिवाय कोणीही अवलंबुन नाही. अर्जदार ही आजारी असून तिला ओषधोपचार सुरु असुन तिची काळजी घ्यावी लागते परंतु गैरअर्जदार क्रमांक १ ने तिला सोडुन दिल्या पासुन तिच्या उदरनिर्वाह व ओषोधोपचाराची कोणतीही काळजी न घेऊन त्याने पती म्हणुन त्याची नैतीक कर्तव्य व कायदेशीर जबाबदारी साभाळण्यात कसूर करुन अर्जदारावर अन्यायय केला आहे. गैरअर्जदार क्रमांक १ कडील आर्थीक परिस्थिती चांगली असुन सुध्दा गैरअर्जदार क्रमांक १ यांनी अर्जदाराला पोषणाकरीता, औषधोउपचारा करीता, कोणतीही व्यवस्था केली नसल्यामुळे मासिक रक्कम रुपये १५,०००/– अंतरीम खावटी व घरभाडे रक्कम रुपये ५,०००/– मिळण्यासाठी अर्जदारानी सदरहु अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

७) गैरअर्जदार यांना नोटीस तामील होऊन गैरअर्जदार क्रमांक १ व २ यांनी अभिलेखावर निशानी क्रमांक ११ वर त्याचा लेखी जबाब दाखल केला. त्याने त्याच्या लेखी जबाबामध्ये अर्जदार व गैरअर्जदार यांचा विवाह झाल्याचे मान्य केले आहे.

अर्जदार व गैरअर्जदार क्रमांक १ यांचा विवाह झाल्यापासुन अर्जदार हिला आरोग्याचा त्रास सुरु झाला होता. अर्जदार हिला मासिक पाळीचा त्रास पाच ते सहा महिने असल्यामुळे दोघामध्ये शारिरीक व मानसिक जवळीक पती पत्नी म्हणुन पुर्ण होऊ शकली नाही. अर्जदार ही लग्नानंतर पत्नी धर्म पुर्ण करु शकली नाहीत. त्यामुळे अर्जदार ही गर्भवती राहणे हे फारच अशक्य बाब निर्माण झाली. अर्जदार हीचा गैरअर्जदार क्रमांक १ ने उपचार केला. परंतु अर्जदार हीला डोक्यात वेदना होत होत्या तिला डोके दुखणीचा त्रास सुरु झाला. त्यावेळी अर्जदार ही माहेरी आई वडीलांकडे आल्या व नंतर अमरावती येथे दवाखन्यात जातेवेळी रस्त्यानेच कोमात गेल्या. त्यावेळी अर्जदारांचे आई व वडील व गैरअर्जदार क्रमांक १ हे सोबतच होते. डॉक्टराने अर्जदार हिला तपासल्यानंतर अर्जदाराचे डोक्यात गाठ असल्याचे डॉक्टरांनी सांगीतले व सदरहु गाठीचे ऑपरेशन नागपुर येथे होत असल्याचे समजले. त्यानंतर गाठीचे ऑपरेशन करण्याकरीता अर्जदार हीला नागपुर येथील दवाखन्यात भरती केले.

८) गैरअर्जदार पुढे असे कथन करतात की, दिनांक २४ जानेवारी २०२१ रोजी अर्जदाराचे गाठीचे ऑपरेशन झाले. अर्जदाराचे ऑपरेशन झाल्यानंतर अर्जदार हिला काही दिवस बरे वाटले त्यानंतर तिला पुन्हा डोक दुखीचा त्रास सुरु झाल्यामुळे अर्जदाराचे आई वडीलांनी व गैरअर्जदार क्रमांक १ यांनी अर्जदाराला पुन्हा नागपुर येथील दवाखन्यात भरती केले. अर्जदाराला दवाखन्यात भरती केल्यानंतर अर्जदाराच्या पुन्हा तपासण्या

करण्यात आल्या. तपासणी अंती डॉक्टराने पुन्हा सन २०२२ मध्ये अर्जदाराच्या डोक्याच्या गाठीचे दुसरे ऑपरेशन केले. त्यावेळेस गैरअर्जदार क्रमांक १ व त्यांचे कुटूंब हजर होते. अर्जदार हीच्या दोन्ही ऑपरेशनचा खर्च महात्मा फुले आरोग्य योजना मधुन करण्यात आला.

९) गैरअर्जदार पुढे असे कथन करतात की, गैरअर्जदार क्रमांक १ याला समजले की, अर्जदार हिला ब्रेन टयुमर कॅन्सरचा त्रास आहे व तिसऱ्या स्टेज मध्ये कॅन्सर आहे. गैरअर्जदार क्रमांक १ चे अर्जदार सोबत लग्न झाल्यापासुन अर्जदार हिची शारिरीक व मानसिक तब्येत अत्यंत बिघडत असल्यामुळे गैरअर्जदार क्रमांक १ हा अर्जदारासोबत पती पत्नी सुखापासुन कायमचा वंचित राहीला. गैरअर्जदार क्रमांक १ हा चार ते पाच वेळा अर्जदाराच्या माहेरी भेटण्याकरीता स्वतःहुन येत होता व कित्येक वेळा अर्जदार हिला फोन करुन मानसिक आधार देऊन तब्येतीची विचारपुस करीत होता. अर्जदाराच्या माहेरची आर्थीक परिस्थीती सदृड असतांना सुध्दा अर्जदाराच्या आई वडीलांचा खाण्यापिण्याचा, राहण्याचा नागपुर मधील खर्च गैरअर्जदार क्रमांक १ याने नातेवाईक तसेच मित्राकडुन उसनवार करुन पुर्ण केला. गैरअर्जदार क्रमांक १ ची आर्थीक परिस्थीती अत्यंत गरीबीची असुन गैरअर्जदार हयाच्या जवळ ना स्वतःचे राहते घर, ना स्वतःचे शेत असुन मोलमजुरी करुन स्वतःचा व वृध्द आजोबांचा सांभाळ आपल्या तुटपुंज्या मोलमजुरीच्या कमाईतुन करीत असतो. गैरअर्जदार क्रमांक १ यांचे आजी व आजोबा हे सतत बिमार राहत असुन त्यांना वयामानानुसार बि.पी. व शुगर चा त्रास आहे. त्यांच्या देखभालीचा व आरोग्याचा खर्च गैरअर्जदार क्रमांक १ हा आपल्या व तुटपुंज्या कमाईतुन करीत असतो.

**१०)** गैरअर्जदार पुढे असे कथन करतात की, अर्जदार हीचे शिक्षण १२ वी पर्यंत झालेले आहे. अर्जदार हिला लहानपणपासुन उत्तम प्रकारे मेहंदी काढण्याची कला अवगत असुन शालेय शिक्षणासोबत मेहंदीचे लग्न समारंभारत काम करीत असते. तसेच अर्जदार हिला भरतकाम, ब्युटी पार्लरचे काम सोबतच शिलाई मशिनचे काम करण्याची कला अवगत असुन अर्जदार ही महिन्यायला रक्कम रुपये १०,०००/– ते रक्कम रुपये १५,०००/– कमाई करीत असते. अर्जदार हिने गैरअर्जदार क्रमांक १ याला आर्थीक व मानसिक त्रास देण्याच्या उद्देशाने सदरहु अर्ज केला आहे. करीता गैरअर्जदारांनी सदरचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

**११)** अर्जाचे व गैरअर्जदाराने दाखल केलेल्या त्याच्या म्हणण्याचे आणि अभिलेखावर दाखल केलेले कागदपत्राचे अवलोकन केले.

**१२)** अर्जदार व गैरअर्जदार यांच्या विद्वान वकिलांचा युक्तिवाद ऐकला.

**१३)** अर्जातील मागणीचा विचार करता, खालील मुद्दे विचारार्थ उत्पन्न झालेले आहेत. त्यावरील निष्कर्ष खालील नमुद कारणांसाठी त्यापुढे नमुद करण्यात आलेले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | अर्जदार हीने तिच्यासमवेत कौंटुबिक हिंसाचार झाल्याचे प्रथमदर्शनी सिध्द केले आहे काय ? | होकारार्थी. |

| | | |
|---|---|---|
| ०२. | अर्जदार हे गैरअर्जदार क्रमांक १ कडुन मागणीप्रमाणे अंतरीम पोटगी मिळण्यास पात्र आहे काय ? | अंशतः होकारार्थी. |
| ०३. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## का र ण मि मां सा

**१४)** पुढे जाण्यापूर्वी याठिकाणी हे नमुद करणे गरजेचे आहे की, पक्षकारांदरम्यांनचे नातेसंबंध तसेच अर्जदार व गैरअर्जदार हे विभक्त राहत असल्याची बाब दोन्ही बाजुदरम्यांन विवादीत नाही. त्यामुळे प्रस्तुतच्या अर्जातील गुणवत्ता किंवा इतरत्र दोन्ही बाजुच्या पक्षकारांदरम्यांन अविवादीत असलेल्या बाबींच्या प्रकाशात तपासणे गरजेचे ठरते.

**मुद्दा क्रमांक १ करीता :-**

**१५)** महिलांचे घरगुती हिंसाचारापासुन संरक्षण अधिनियम, २००५ चे कलम २३(२) च्या प्रकाशात या न्यायालयास जर अर्जदाराने प्रथमदर्शनी ती घरगुती हिंसाचाराची बळी असल्याचे सिध्द केल्यास प्रस्तुत अर्जात मागणी केल्याप्रमाणे अंतरिम पोटगीचा आदेश पारीत करता येतो. अधिनियमाच्या कलम ३(३) मध्ये देण्यात आलेल्या घरगुती हिंसाचाराच्या व्याख्येप्रमाणे “महिलेस शारीरिक किंवा मानसिकरित्या नुकसान किंवा इजा पोहचेल किंवा तिच्या जिवीतास किंवा सुरक्षिततेस धोका निर्माण होईल असे कोणतेही कृत्य किंवा कोणतेही वर्तन” घरगुती हिंसाचार ठरतो. यापुढे जावुन

अधिनियमाच्या कलम ३(३) च्या स्पष्टीकरणाच्या प्रकाशात क्लेश, धमकी, अनाचार, हुंडा किंवा संपत्तीची मागणी, शारिरीक शोषण, मानसिक शोषण, आर्थिक शोषण, भावनात्मक शोषण इत्यांदीचा समावेश देखील घरगुती हिंसाचाराच्या व्याख्येत येतो. त्यामुळे अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जाची गुणवत्ता वरनमुद व्याख्येच्या प्रकाशात तपासणे गरजेचे ठरते.

**१६)** अर्जदाराचा अर्ज व त्यासमर्थनार्थ तिच्या सत्यापनाप्रमाणे प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, विवाहाच्या काही दिवसानंतर गैरअर्जदारांनी तिला वरनमुद केल्याप्रमाणे तिच्या औषधोपचार केला नाही. तसेच तिला माहेरुन नांदावयास आणले नाही. अशा विवीध कारणांवरुन शारिरीक व मानसिक त्रास दिला. गैरअर्जदारांनी अर्जदाराच्या वतीने करण्यात आलेल्या सदर कथनांना स्पष्टरित्या नकार दिला आहे. अशा परिस्थितीत अभिलेखावर दोन्ही पक्षकांराच्या वतीने सादर करण्यात आलेल्या दस्तांवरुन, अर्जदार हे गैरअर्जदार क्र.१ पासुन विभक्त राहात असल्याची बाब विवादीत नाही. अशा परिस्थितीत पती म्हणुन तिची देखभाल करण्याची जबाबदारी गैरअर्जदार क्र.१ ची असतांना देखील त्याने तिच्या पालनपोषणाची काही एक सोय केल्याचे अभिलेखावरुन दिसुन येत नाही किंवा तसा बचाव देखील त्याच्या वतीने घेण्यात आलेला नाही.

**१७)** एकुणच अर्जदाराच्या वतीने अर्जाच्या समर्थनार्थ सादर केलेल्या तिच्या सत्यापनाचे शपथपत्र आणि गैरअर्जदारांच्या वतीने घेण्यात आलेला बचाव इत्यादींच्या प्रकाशात, प्रस्तुत प्रकरणात गैरअर्जदारांनी तिचा छळ केला किंवा नाही अशा स्वरुपाचा

महत्वाचा संपरिक्षेलायक मुद्दा प्रस्तुत अर्जाच्या सुनावणीवेळी निर्माण झालेला आहे. अर्जदाराने तिला कोणतेही उत्पन्नाचे साधन नसल्याचे कथन केलेले आहे. गैरअर्जदार क्र.१ ने निशाणी क्र.१२ वर स्वतःचे मालमत्ता व जबाबदारीचे शपथपत्र दाखल केलेले आहे. गैरअर्जदार क्रमांक १ ने त्याच्यावर अर्जदारांव्यतिरीक्त इतर जबाबदारी असल्याबाबतचे कोणतेही कथन केलेले नाही व कोणताही तोंडी अथवा कागदोपत्री पुरावा दिलेला नाही. तसेच गैरअर्जदार क्र. १ याने अर्जदार ही तिचा उदरनिर्वाह करणेस समर्थ असलेबाबत देखील कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. यावरुन अर्जदार क्रमांक १ ही तिचा उदरनिर्वाह करणेस असमर्थ आहेत असे दिसून येते. तसेच तिने तिच्या शपथपत्रामध्ये तिच्या गैरअर्जदार तर्फे झालेल्या शारिरीक व मानसिक छळाबाबतच्या घटना नमुद केल्या आहेत. यावरुन प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, अर्जदार ही संयुक्तीक कारण असल्यामुळे तसेच गैरअर्जदारांपासुन तिचा शारिरीक व मानसिक छळ होत असल्यामुळे तसेच गैरअर्जदार क्रमांक १ हा तिला नांदावन्यास घेऊन येत नसल्यामुळे विभक्त राहत आहे.

१८) अर्जदार ही बऱ्याच दिवसांपासुन गैरअर्जदार क्र.१ पासुन वेगळी रहात असतांना देखील अर्जदाराच्या पालनपोषणाची व ओषधोपचाराची काही एक सोय केलेली नाही. तसेच अर्जदार यांचे पती असल्याच्या नात्याने गैरअर्जदार क्रमांक १ ने तिच्या पालनपोषण व औषधोपचाराकरीता देखील कोणतीही मदत केली नाही. अर्जदाराचे पालनपोषण न करणे हे देखील अधिनियमचा कलम ३(३) च्या स्पष्टीकरणाच्या प्रकाशात घरगुती हिंसाचाराच्या व्याख्येत बसते.

१९) अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ हे पती–पत्नी आहेत. त्यामुळे गैरअर्जदार क्र.१ यांनी अर्जदारांची पालनपोषण व औषधोपचार करण्याची कायदेशीर व नैतिक जबाबदारी आहे. अर्जदार हिच्या चरितार्थाचा विचार करता आजच्या महागाईच्या दिवसात चरितार्थासाठी, औषधोपचार खर्च या सर्व गोष्टींसाठी पैंशाची आवश्यकता आहे व या सर्व गरजा पती या नात्याने गैरअर्जदार क्र.१ यांनीच पूर्ण करणे आवश्यक आहे. परंतु गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार ह्यांची उपेक्षा करुन आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यात तो अयशस्वी झालेला आहे हे प्रथमदर्शनी शाबीत झाले आहे. मा.सर्वोच्च न्यायालय यांनी ***Rajnesh Versus Neha** (2021) 2 **SCC** 324*, या प्रकरणात असे निर्देशित केलेले आहे की,

> *81. A careful and just balance must be drawn between all relevant factors. The test for determination of maintenance in matrimonial disputes depends on the financial status of the respondent, and the standard of living that the applicant was accustomed to in her matrimonial home. The maintenance amount awarded must be reasonable and realistic, and avoid either of the two extremes i.e. maintenance awarded to the wife should neither be so extravagant which becomes oppressive and unbearable for the respondent, nor should it be so meagre that it drives the wife to penury. The sufficiency of the quantum has to be adjudged so that the wife is able to maintain herself with reasonable comfort.*

अभिलेखावरील अर्जदाराच्या शपथपत्रावरुन प्रथमदर्शनी असे दिसुन येते की, गैरअर्जदार क्र.१ याने कोणत्याही संयुक्तिक कारणाशिवाय अर्जदार यांची उपेक्षा करुन त्यांचे

पालनपोषन करण्याचे नाकारले आहे. अशा परिस्थितीत गैरअर्जदाराने अर्जदाराचा कौंटुबिक हिंसाचार केल्याचे प्रथमदर्शनी सिध्द केले आहे. त्यामुळे विचारार्थ असलेल्या मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी स्वरुपात नोंदविण्यात येत आहे.

<u>मुद्दा क्रमांक २ साठी</u> :-

२०) अर्जदाराच्या अर्जाप्रमाणे गैरअर्जदार क्रमांक १ यांच्याकडे शेती असुन तो शेतामधील पिका घेऊन वर्षाला रक्कम रुपये ७,००,०००/- कमवितो. मात्र गैरअर्जदारांच्या वतीने सदरची बाब विवादीत करण्यात आलेली असून, अर्जदाराने गैरअर्जदाराला वर नमुद प्रमाणे उत्पन्न मिळत असल्याचे दर्शविण्यासाठी कागदोपत्री पुरावा अर्जदाराने दाखल केला नाही.

२१) गैरअर्जदाराने असे कथन केले की, अर्जदार हीला कॅन्सरचा त्रास असुन त्यांच्यामध्ये शारिरीक संबंध प्रस्थापीत झाले नाही. म्हणुन, अर्जदार ही गैरअर्जदार क्रमांक १ पासुन खावटी मिळण्यास पात्र नाही म्हणुन सदरहु अर्ज नामंजुर करण्याची त्याने कथन केले. परंतु, अर्जदाराने दाखल केलेला अर्ज, शपथपत्र व दस्तऐवजांवरुन पथमदर्शनी असे दिसुन येते की, अर्जदार हीचा गैरअर्जदारांनी नांदाविण्यास आणले नाही तसेच औषधोपचाराचा खर्च केला नाही, शारिरीक व मानसिक छळ व हिंसाचार केला आहे व त्यामुळे अर्जदार ही गैरअर्जदार क्रमांक १ पासुन विभग्त राहत आहे. अर्ज व शपथपत्रात

अर्जदाराने केलेल्या कथनानुसार तिला होत असलेल्या शारिरीक व मानसिक हिंसाचार या संयुक्ती कारणामुळे ती गैरअर्जदार क्रमांक १ पासुन विभक्त राहत आहे हे प्रथमदर्शनी तिने शाबीत केले आहे.

२२) अर्जात नमुद केल्याप्रमाणे अर्जदाराने गैरअर्जदार हा शेतीतुन रक्कम रुपये ७,००,०००/– उत्पन्न मिळवितो असे नमुद केले आहे व दस्तऐवज यादी नि.क्र.२० सोबत शेतीचे सातबारे उतारे दाखल केले आहे. परंतु, सदर ७/१२ उताऱ्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सदरहु शेती ही गैरअर्जदार क्रमांक १ च्या नावे नाही. तसेच अर्जदार ही गैरअर्जदार क्रमांक १ चे उत्पन्न दर्शविण्यासाठी तशा पध्दतीचे दस्तऐवज अर्जदारास सहजरित्या उपलब्ध झाले असते. परंतू, तिने सदरचे दस्त अभिलेखावर सादर केलेले नाहीत. अशा परिस्थितीत वरनमुद विश्लेषण व अविवादीत करण्यात आलेले तथ्य, गैरअर्जदार क्रमांक १ चे विवादीत उत्पन्न, आजची महागाई आणि अधिनियमाच्या उद्देश्याच्या प्रकाशात, गैरअर्जदार क्रमांक १ याने पती म्हणुन अर्जदार हीच्या पालनपोषणासाठी दरमहा रुपये २,०००/– इतकी अंतरिम पोटगी देण्याबाबत आदेशीत करणे न्यायोचित ठरेल. अर्जदार हीने घरभाडे पोटी रक्कम रुपये ५,०००/– ची मागणी केली आहे. परंतु, ति भाडयाने राहत असल्याबाबतचा व घरभाडे म्हणुन रक्कम रुपये ५,०००/– खर्च येत असल्याबाबतचा कोणताही दस्तऐवज अभिलेखावर दाखल केला नाही. म्हणुन ती घरभाडे मिळण्यास पात्र नाही. वरनमुद विश्लेषणाच्या प्रकाशात विचारार्थ असलेल्या मुद्दा क्र.२ चा निष्कर्ष अंशतः

होकारार्थी स्वरुपात नोंदविण्यात येत असुन, मुद्दा क्र.३ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज अशंतः मंजूर करण्यात येत आहे.

२. गैरअर्जदाराने अर्जदार यांना अर्ज दाखल तारखेपासुन ते पुढील आदेशापावेतो दरमहा अंतरिम पोटगी म्हणुन **रुपये २,०००/– (दोन हजार फक्त)** देण्याबाबत आदेशीत करण्यात येत आहे.

३. प्रस्तुत आदेशाची प्रत अर्जदारास मोफत देण्यात यावी.

स्वा/-

**दिनांक : ०६.०७.२०२६.**
**स्थळ : तिवसा.**

**(रोहिणी वि. मनोरे)**
**दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर),**
**तिवसा**